साप्ताहिक
कात्रजच्या बोगद्यातून
ग्रामीण भागातील वाचकांचे आवडते साप्ताहिक
२९३/२९२ शनिवार पेठ, ऐश्वर्या अपार्टमेंट, तांबे बोळ, पुणे ३०
फोन : २४४७१५४३ फॅक्स : २४४९५३०७

विदर्भ, मराठवाडा, मुंबई, कोकण, गोवा, अमरावती, उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातून वितरीत होणारे एकमेव दैनिक

लोकमान्य सांजवार्ता

R.N.I.NO. 70111/99 PCW/009/2018-2020

लोकमान्य सांजवार्ता
एक अद्वितीय सायंदैनिक
दररोज वाचा
किंमत १ रुपये, पाने ४
(रविवार सुट्टी)
ज्ञान, विज्ञान, मनोरंजन आणि ताज्या घडामोडींनी भरलेला दररोज दु. ४ वाजता आपल्या हाती
२९३/२९२ शनिवार पेठ, तांबे बोळ, पुणे -३०
फोन : २४४७१५४३/ २४४९५३०७

वर्ष २० वे/अंक २६६ वा ◆ शहर आवृत्ती/पुणे, मंगळवार १७ डिसेंबर २०१९ (दैनिक) Posted at S.P. College Post Pune-30 /December 19 ● पृष्ठे-४ ● किंमत एक रुपया

थोडक्यात

तेजस्विनी बस सेवेचे लोकार्पण

पिंपरी (प्रतिनिधी) : जुनी सांगवी येथे पी.एम.पी.एम.एल च्या तेजस्विनी बस सेवेचे लोकार्पण करताना आमदार लक्ष्मण जगताप ,महापौर उषा उर्फ माई ढोरे, नगरसेवक हर्शल ढोरे, संतोष कांबळे नगरसेविका शारदा सोनवणे, आदि मान्यवर उपस्थित होते.

पक्के अनुज्ञप्तीसाठी १९ डिसेबरला चाचणी शिबीराचे आयोजन

अहमदनगर (प्रतिनिधी) : उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शिकाऊ अनुज्ञप्ती धारकांची मुदत माहे डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२० अखेर समाप्त होत आहे. सद्यस्थितीत अपुरा अधिकारी वर्ग विचारात घेता शिकाऊ अनुज्ञप्ती धारकांना पक्के अनुज्ञप्ती चाचणीसाठी दिनांक १९ डिसेंबर २०१९ रोजी शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. अनुज्ञप्ती चाचणीची ऑनलाईन अपॉईमेंट दिनांक १८ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ८ वाजता parivahan.gov.in या संकतस्थळावरुन घेता येतील. नागरीकांनी ऑनलाईन अपॉईमेंट घेऊन पक्के अनुज्ञप्ती चाचणी करीता दिनांक १९ डिसेंबर २०१९ रोजी शिबीरात उपस्थित रहावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या चैतन्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे 'डॉ. सायरस एस. पुनावाला इंग्रजी माध्यम शाळा' आणि उत्कर्ष इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे 'विलू पुनावाला इंग्रजी माध्यम शाळा' असे नामकरण पवार यांच्या हस्ते झाल (डावीकडून) संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री भोसले, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे सीईओ श्री आदर पुनावाला, श्री शरद पवार, संस्थेचे कार्याध्यक्ष श्री वालचंद संचेती, श्री सायरस पुनावाला, खजिनदार श्री उदय पुंडे व श्री सुभाष आगरवाल.

पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्रात कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्य मोलाचे : शरद पवार

पुणे (प्रतिनिधी) : ''पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्रात कॅम्प एज्युकेशन सोसायटीने दिलेले योगदान मोलाचे आहे. समाजातील उपेक्षित आणि गरीब वर्गातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन या संस्थेने अनेक पिढ्या घडविल्या.'' असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी केले.

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या चैतन्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे 'डॉ. सायरस एस. पुनावाला इंग्रजी माध्यम शाळा' आणि उत्कर्ष इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे 'विलू पुनावाला इंग्रजी माध्यम शाळा' असे नामकरण पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर मा. डॉ. सायरस पुनावाला, कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा. श्री वालचंद संचेती, सिरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला, उपकार्याध्यक्ष अण्णासाहेब भोसले, मानद सचिव बाबुराव जवळेकर, खजिनदार उदय पुंडे, संस्थेच्या माजी कार्याध्यक्षा श्रीमती मोहिनी तेलंग, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सुभाष अगरवाल, डॉ. आय. एस. मुल्ला, दिलीप सराफ, डॉ. मिलिंद तेलंग, ॲड. भगवान बेंद्रे, श्री. जवाहरलाल बोथरा, शशिकांत पवार आदी उपस्थित होते. पवार यांचा परिचय डॉ. आय. एस . मुल्ला यांनी, तर पूनावाला यांचा परिचय अगरवाल यांनी करून दिला.

पवार म्हणाले, 'कॅम्प एज्युकेशन सोसायटी आणि सायरस पूनावाला यांचे यानिमित्ताने नाते निर्माण झाले आहे. हे नाते उत्तरोत्तर अधिक दृढ व्हावे. त्यामुळे संस्थेचा अधिकाधिक विकास होऊ शकेल.' '

'तेलगू भाषिकांनी कॅम्प एज्युकेशन सोसायटी सुरू केली. आचार्य प्र. के. अत्रे हे या शाळेचे मुख्याध्यापक होते. कॉलेज जीवनात मी पुण्यामध्ये असल्यापासून कॅम्प एज्युकेशन सोसायटीचा नावलौकिक ऐकून आहे. आजही संस्थाचालकांनी ही परंपरा अखंडितपणे सुरू ठेवली आहे.' असे गौरवोद्गार पवार यांनी काढले.

शिक्षणाच्या दर्जाविषयी चिंता व्यक्त करताना पवार म्हणाले, 'सध्या विद्यार्थ्यांना ९४ ते ९६ टक्के गुण मिळत आहेत, ही चांगली बाब आहे; पण संबंधित विद्यार्थी जीवनाच्या क्षेत्रात कितपत यशस्वी होतात. हे पहाणे आवश्यक आहे. भविष्यात गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी घडले पाहिजे, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.'

सायरस पूनावाला यांच्याबद्दल पवार म्हणाले, आमची आम्ही महाविद्यालयापासून मैत्री आहे.

दोघांनीही जे क्षेत्र निवडले, त्या क्षेत्रामध्ये यशस्वी झालो. सामाजिक बांधिलकी ठेवून काम केले तर आपण काहीही करू शकतो, हे सायरस पूनावाला यांनी दाखवून दिले आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांनी विलू पूनावाला फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक संस्थांना मदतीचा हात पुढे केला आहे. त्यांच्यामुळे कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या विकासालाही हातभार लागेल, असा विश्वास वाटतो'

यानिमित्ताने सायरस पूनावाला म्हणाले,' इंग्रजी ही जागतिक संपर्काची भाषा आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा शिकणे आवश्यक आहे.' कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळा अधिकाधिक विकसित व्हाव्या, यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

प्रास्ताविक करताना वालचंद संचेती म्हणाले, 'दुसऱ्यांच्या व्यथेला आणि वेदनेला जाणून लोकांसाठी प्रेमरूपी आणि वात्सल्यरूपी सावली देणारे झाड प्रत्येकाने बनले पाहिजे. ही भावना केवळ संवेदनशील व्यक्तीच्या हृदयात उत्पन्न होते. त्यातून करुणेचा स्पर्श होऊन समाजाची सेवा होत असते.

याच तत्त्वाने आदरणीय पवार साहेब आणि पुनावाला साहेब हे आज काम करत आहेत. कॅम्प एज्युकेशन सोसायटी ही गेली १३४ वर्षे शिक्षणाच्या माध्यमातून केवळ माणसामाणसांपर्यंत नाही, तर प्रत्येक पिढीपर्यंत पोहोचण्याचे भगीरथ कार्य करत आली आहे.

मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग टोलवसुली बेकायदा जाहीर करण्याची मागणी

जानेवारीत ही याचिका सुनावणीस येण्याची शक्यता आहे

मुंबई (प्रतिनिधी) : टोलच्या माध्यमातून राज्य रस्ते विकास महामंडळास (एमएसआरडीसी) सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारा मार्ग अशी ओळख असलेल्या मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील (एक्स्प्रेस वे) टोलवसुलीचे प्रकरण पुन्हा एकदा उच्च न्यायालयात आले आहे.

या द्रुतगती महामार्गावर सध्या होत असलेली टोलवसुली बेकायदा जाहीर करावी, पुढील दहा वर्षांच्या टोलवसुलीच्या कंत्राटासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रकियेला याचिका निकाली निघेपर्यंत स्थगिती द्यावी आणि लहान वाहनांना टोलवसुलीतून मुक्त करावे, अशी मागणी न्यायालयात करण्यात आली आहे.

ठाणे स्थित प्रवीण वाटेगावकर यांनी ही याचिका केली असून न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठासमोर सोमवारी ती सादर करण्यात आली. जानेवारीत ही याचिका सुनावणीस येण्याची शक्यता आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या बांधणीसाठी झालेला खर्च वसूल करण्यासाठी २००४ पासून द्रुतगती महामार्ग आणि जुना मुंबई-बंगळूरु महामार्गावर (राष्ट्रीय महामार्ग-४) टोल वसुली सुरू करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला होता. त्यावेळी १० ऑगस्ट २०१९पर्यंतचा टोलवसुलीचा ठेका आयडियल रोड बिल्डर्स (आयआरबी) कंपनीस देण्यात आला. या महामार्गावरील टोलवसुलीची मुदत सन २०३० पर्यंत असून उर्वरित काळासाठी म्हणजेच १० वर्षे आठ महिन्यासाठी पुन्हा एकदा नव्याने टोलवसुलीचा ठेका देण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात प्रथमच टोल ऑपरेट ॲण्ड ट्रान्स्फर (टीओटी) तत्त्वावर निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून सरकारने या टोलची किंमत नऊ हजार कोटी रुपयांची निश्चित केली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश महामंडळास दिले आहेत.

मात्र २००४ मध्ये जी निविदा प्रक्रिया राबवली ती योग्य प्रकारे राबवण्यात आली असती तर प्रकल्पाची संपूर्ण किंमत त्या प्रक्रियेमध्येच वसूल झाली असती.

विक्रम सोलारने भारतातील आणखी तीन विमानतळांसाठी सौर उर्जा पुरवठा उपलब्ध केला

पुणे (प्रतिनिधी) : भारताच्या अग्रणी सोलार मॉड्यूल उत्पादक तसेच प्रबल रूफटॉप सोलार आणि ईपीसी सोल्युशन्स पुरवठाकारांपैकी एक असलेल्या विक्रम सोलारने एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया (एएआय) साठी डिब्रुगढ, गया आणि गोंदिया मध्ये तीन नव्या सौर प्रकल्पांचे कमिशनिंग करून भारतातील विमानतळांच्या सौरीकरणात कंपनीच्या हातभाराला आणखी एक जोड दिली.

या तीन नव्या प्रकल्पांची एकत्रित क्षमता ११६५ किलोवॅट (किंवा१.१ मेगावॅट) असून त्याने आजवर भारतभरात ४ मेगा वॅटहूनही अधिक एकत्रित क्षमतेसोबत ६ सौर प्रकल्प कमिशन करण्याचा पोर्टफोलियो व अनुभव मिळवून दिलेले आहेत.

डिब्रुगढ, आसाम विमानतळ येथील सौर प्रकल्पाची क्षमता ७२५ किलोवॅट असून प्रकल्पाची रचना सौर विमानतळाच्या स्वरूपात सेवा देण्यासाठी केली गेलेली आहे. प्लांटकडून २००-२२० गाड्यांची सोय पाहील असे अपेक्षित आहे. कारपोर्टच्या ८००० वर्ग मीटर क्षेत्राला व्यापण्यासाठी विक्रम सोलारचे ३४५डब्ल्यूपी मोनो क्रिस्टलाईन मॉड्यूल्स वापरले गेले. प्लांटकडून दर वर्षी अंदाजे १०,४०,००० केडब्ल्यूएच हरित उर्जा निर्माण करणे अपेक्षित आहे.

गोंदिया, महाराष्ट्र विमानतळ प्लांटची क्षमता २२० किलोवॅट असून यासाठी विक्रम सोलारचे ३३० डब्ल्यूपी पॉलिक्रिस्टलाईन एल्डोरा ग्रँडसिरीज मॉड्यूल्स वापरले गेले. हा भूमी-स्थित सौर प्रकल्प बिरसी विमानतळ कार्यालय इमारतीला वीजपुरवठा करणार आहे.

गया, बिहार येथील सौर प्लांटची क्षमतासुध्दा २२० किलोवॅटच आहे. सौर प्लांटसाठी एल्डोरा ग्रँडसिरीज ३२५ डब्ल्यूपी मॉड्यूल्स वापरले गेले असून तो गया विमानतळातील ४ विमानतळ इमारतींना वीजपुरवठा करेल असे अपेक्षित आहे.

डीईएस सेकंडरीत 'निसर्ग महोत्सव'

पुणे (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग प्रेम वृद्धिंगत व्हावे आणि जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या डीईएस सेकंडरी स्कूलने आयोजित केलेल्या 'निसर्ग महोत्सवा'त वीस शाळांतील १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पहिल्या दिवशी 'हवा आणि पाणी दिन' साजरा करण्यात आला.

हवामान बदल या विषयावरील पथनाट्य स्पर्धा, सिंहगड रस्त्यावरील वडगाव जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन जलवितरणाची माहिती घेणे, ऑयकॉस संस्थेच्या केतकी साठे यांचे नदीशी संवाद हे व्याख्यान आणि सिमला ऑङ्गिसला शैक्षणिक सहल या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्र विकासात तरुणांची भूमिका विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद

पोलीस अधिकारी व मिसेस इंडिया प्रेमा पाटील यांची 'सूर्यदत्ता'मध्ये' व्याख्याने

पुणे (प्रतिनिधी) : देशाच्या विकासात तरुणांची भूमिका अतिशय महत्वाची असून, एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्या देशात तरुणवर्ग मोठा आहे. त्यांच्या योगदानातूनच देशाच्या प्रगतीला गती मिळेल. ते सामाजिक आणि आर्थिक विकासाचे स्तंभ आहेत. मात्र, देशात वाढत असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटना गंभीर आहेत. महिला सुरक्षेबाबत तरुणांनी जागरूक राहायला हवे. समाज माध्यमांवर व्यक्त होताना, महिलांविषयी मजकूर टाकताना काळजी घ्यायला हवी. त्याबाबत विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन समाजात जनजागृती करायला हवी, असा सल्ला पुणे पोलिसांच्या भरोसा सेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजया कारंडे यांनी दिला.

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे 'देशाच्या विकासात तरुणांची भूमिका' व्याख्यानावेळी पोलीस अधिकाऱ्यांसमवेत प्रा. डॉ. संजय चोरडिया.

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने बावधन कॅम्पसमध्ये आयोजित 'महिला सुरक्षा आणि देशाच्या उभारणीतील तरुणांची भूमिका' या विषयावरील व्याख्यानावेळी विजया कारंडे बोलत होत्या. प्रसंगी राज्याचे माजी पोलीस महासंचालक अरविंद इनामदार यांच्यासह पोलीस सुरक्षा दलातील शूर व्यक्तींना मानवंदना देण्यात आली. 'ब्युटी विथ ब्रेन' अशी ओळख आणि मिसेस इंडिया असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमा विग्नेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक श्री. घोडके, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी आणि प्राध्यापकांची चर्चासत्रे झाली.

प्रेमा पाटील म्हणाल्या, मुलींनी आपण कोणत्या व्यक्तीवर विश्वास ठेवतो, याची काळजी घेणे आवश्यक आहे. महिलांची सुरक्षा ही केवळ महिलांची जबाबदारी नसून, आपल्या मुलांना महिलांचा आदर करण्याचे संस्कार द्यायला हवेत. योग्य संगोपनच हा बदल घडवू शकते.

रब्बी पिकांवरही अमेरिकन लष्करी अळीचा हल्ला

मुंबई (प्रतिनिधी) : नोव्हेंबर महिन्यात परतीचा पाऊस चांगलाच बरसला. त्यामुळे यावर्षी रब्बी हंगामाचा पेरा अतिशय चांगला झाला. मात्र पहिल्यांदाच रब्बी हंगामातील ज्वारी व हरभरा या दोन पिकांवर लष्करी अळीचा मारा झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत नवी भर पडली आहे.

खरीप हंगामातील मक्यावर लष्करी अळीचा हल्ला होतो हे शेतकऱ्यांना ज्ञात आहे. मात्र यावर्षी कापूस, सोयाबीन, भात, ज्वारी व हरभरा अशा अन्य पिकांवरही लष्करी अळीचा हल्ला होत असल्याने शेतकऱ्यांना यातून सुटका कशी करून घ्यायची? याची चिंता लागली आहे. लष्करी अळी ही पाने कुरतडून पोंग्यात शिरते. त्यामुळे पानाची प्रत खराब होते. या किडीचे पतंग एका वेळी १ हजार अंडी पुंजक्यात देते.

स्वातंत्र्यवीर सावरकर समजून घेण्यासाठी पुणेकरांनी राहुल गांधींना पाठविली पुस्तके

पुणे (प्रतिनिधी) : माफी मागायला मी कुणी राहुल सावरकर नाही, या काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या विधानामुळे संतप्त झालेल्या पुण्यातील सावरकर प्रेमी मंडळाने राहुल गांधी यांना स्वातंत्र्यवीर सावरकर समजून घेण्यासाठी पुस्तके पाठविली आहेत. किमान ही पुस्तके वाचून राहुल गांधी यांना सावरकरांच्या देशप्रेमाची, त्यागाची आणि देशभक्तीची जाणीव होईल, अशी अपेक्षा पुण्यातील सावरकर प्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

'सत्य बोललो म्हणून मला माफी मागायला सांगितली जातेय. मी काहीही चुकीचं बोललेलो नाही. त्यामुळं मी घाबरणार नाही. माफी मागायला मी कुणी राहुल सावरकर नाही. मी राहुल गांधी आहे,'

सूर्यकांत पाठक

अशा राहुल गांधी यांनी केलेल्या विधानामुळे देशभरातील सावरकर प्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पुण्यामध्ये देखील या विधानाचा ठिकठिकाणी विरोध झाला. मात्र, या सावरकरप्रेमींनी पुस्तके देऊन याचा निषेध केला आहे. सावरकर प्रेमी मंडळाच्यावतीने सूर्यकांत पाठक यांनी पुढाकार घेत ही पुस्तके पाठविली आहेत.

सूर्यकांत पाठक म्हणाले, लेखक विक्रम संपथ यांचे सावरकर आणि वैभव पुरंदरे यांचे सावरकर - द ट्रू स्ट्रोरी ऑफ द फादर ऑफ हिंदुत्व ही इंग्रजी भाषेतील पुस्तके आम्ही राहुल गांधी यांना पाठविली आहेत.

किमान ही पुस्तके वाचून तरी त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे कार्य समजू शकेल. या पुस्तकांच्या वाचनातून राहुल गांधी यांचे सावरकरांविषयी गैरसमज दूर होतील, अशी आम्हाला आशा आहे.

ठळक वैशिष्ट्ये

- नवी दिल्ली : मराठमोळे मनोज नरवणे २८वे लष्कर प्रमुखपदी
- नवी दिल्ली : इंडिया गेटसमोर प्रियंका गांधींचे आंदोलन
- नवी दिल्ली : राहुल गांधी यांना नोटीस
- नवी दिल्ली : सावित्रीबाई फुले विद्यापीठात आंदोलन
- लखनौ : नदवा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे दगडफेक आंदोलन
- कोलकाता : ममता बॅनर्जी यांचा मोर्चा
- पुणे : माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांचा ८१वा वाढदिवस
- पुणे : मनपात पुन्हा सिंगल वॉर्ड, थेट नगराध्यक्ष रद्द
- लखनौ : आमदार सेंगर उन्नाव बलात्कारप्रकरणी दोषी
- पुणे : कोंढव्यात इमारतीच्या ५ व्या मजल्यावर आग
- नागपूर : विधान परिषद विरोधीपक्ष नेतेपदी प्रवीण दरेकर

जिल्हा रुग्णालय येथे १७ डिसेंबरला मोफत आयुष निदान व उपचार शिबीराचे आयोजन

अहमदनगर (प्रतिनिधी) : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथे मोफत आयुष निदान व उपचार शिबीराचे आयोजन दिनांक १७ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यत आयुष कक्ष क्रमांक ४० येथे करण्यात आले आहे.

या शिबीरात आयुर्वेद, होमिओपॅथी , युनानी व योग उपचार पध्दतीनुसार निदान व उपचार होणार आहे. आयुर्वेद तसेच योग निसर्गोपचार तज्ञांद्वारा वातव्याधी अर्थात सांधे, स्नायु, मणके, होमिओपॅथी तज्ञांद्वारा त्वचाविकारांवर निदान व उपचार केले जाणार आहेत. मुळव्याध व गुदविकारांवर युनानी तज्ञांद्वारे चिकित्सा केली जाणार आहे. शिबीरामध्ये येणा-या रुग्णांचा आजार आटोक्यात आणण्यासाठी आहार-विहार ,पथ्य तसेच योगासन प्राणायाम यांचा सल्लाही दिला जाणार आहे. आयुष विभागात दररोज आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी योग तज्ञांद्वारा तपासणी व उपचार सुरु आहेत. त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा.

तसेच नियोजित मोफत आयुष निदान व उपचार शिबीरास नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप मुरंबीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संदीप सांगळे, अतिरिक्त जिल्हा शिल्यचिकित्सक डॉ. बापूसाहेब गाढे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. दादासाहेब साळूंके यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे .

डोंबिवलीत २२ वर्षीय तरुणीचा लोकलमधून पडून मृत्यू

मुंबई (प्रतिनिधी) : डोंबिवलीत २२ वर्षीय तरुणीचा लोकलमधून पडून मृत्यू झाला आहे. डोंबिवली ते कोपर स्थानकादरम्यान आज सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. चार्मी प्रसाद असं या मृत तरुणीचं नाव आहे. आज सकाळी ८.५३ ची लोकल चार्मीने पकडली होती. मात्र प्रचंड गर्दीमुळे आत न जाता आल्याने चार्मी बाहेर लटकून राहिली आणि कोपर स्टेशनजवळ तोल जाऊन पडली. याच घटनेत तिचा मृत्यू झाला. राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही हा मुद्दा लोकसभेत मांडला होता. आता डोंबिवलीच्या गर्दीने आणखी एक बळी घेतला आहे. गर्दीने खचाखच भरलेल्या लोकलमधून पडून चार्मी पसाद या तरुणीचं नाव होतं. ती डोंबिवलीची रहिवासी होती. आज सकाळी ८ वाजून ५३ मिनिटांची लोकल चार्मीने डोंबिवली स्थानकातून पकडली.

...हा तर यशस्वी पालकत्वाचा सन्मान : सोळंकी

गोयल गंगा फाउंडेशनतर्फे गुरुवर्य पुरस्कार वितरण

पिंपरी (प्रतिनिधी) : विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या मुलामुलींचे आपल्याला केवळ यश दिसते. पण त्यांच्या अपयशात त्यांना खंबीरपणे साथ व प्रोत्साहन देणारे, त्यांच्यासाठी अहोरात्र कष्ट घेणारे त्यांचे पालक असतात. म्हणूनच त्यांचा त्या यशात मोलाचा वाटा असतो. आज गुरुवर्य पुरस्काराने अशा पालकांचा होणारा गौरव म्हणजे यशस्वी पालकत्वाचा सन्मान आहे, अशा शब्दांत शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी गुरुवर्य पुरस्काराच्या संकल्पनेचे कौतुक केले.

पालकांच्या कष्टाला कौतुकाची थाप देण्यासाठी नुकतेच गोयल गंगा फाऊंडेशनतर्फे या पुरस्काराचे आयोजन केले होते. यावेळी गोयल गंगा फाऊंडेशनचे विश्वस्त जयप्रकाश

गोयल,गीता गोयल,अतुल गोयल, सोनू गुप्ता गोयल,अरुण गुप्ता, इतिहासकार शिवप्रसाद मंत्री, इस्कॉनचे माजी उपाध्यक्ष बाल गोविंद दास , गोयल गंगा इंटरनैशनल स्कुलच्या मुख्याध्यापिका भारती भागवाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुलीच्या परिश्रमात तिला खंबीरपणे साथ देणाऱ्या प्रसिद्ध टेनिसपटू अंकिता रैनाच्या आई ललिता रैना यांना, बेघर मुलांचे पुनर्वसन करणाऱ्या राधिका दळवी यांना जयप्रकाश गोयल आणि विशाल सोळंकी यांनी सन्मानित केले. भारतीय महिला रग्बी संघाच्या कर्णधार वाहबिझ भरुचा यांचे प्रशिक्षक संजय कांबळे यांच्या वतीने वाहबिझ भरुचा हिनेच अतुल गोयल यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. ऑलिंपिकमध्ये जलतरणात शानदार कामगिरी करणाऱ्या कॅमिला पटनायक हिच्या पालकांना बाल गोविंद दास यांच्या हस्ते तर अनुभवावर आधारित शिक्षण मिळण्यासाठी आपल्या मुलींना होम स्कूलिंगच्या माध्यमातून शिकवणारे मंदार व सविता कापशीकर यांना शिवप्रसाद मंत्री यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

अतुल गोयल म्हणाले की,पालक हा मुलाचा पहिला गुरु असतो आणि म्हणूनच प्रत्येक यशस्वी व्यक्तिमत्वामागे कणखरपणे उभ्या राहणाऱ्या त्यांच्या पालकांचा व गुरूंचा आहे. आपल्या मार्गदर्शनातून अनेक यशस्वी विद्यार्थी घडवून देशाच्या प्रगतीस मोलाचा हातभार लावणाऱ्या पालकांचा ,शिक्षकांचा, प्रशिक्षकांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आम्ही गुरुवर्य यावर्षी पुरस्कार देत असतो.